# महाराष्ट्र शासन
## शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
सोमवार पेठ, हत्तीमहल, गंजी गल्ली, कोल्हापूर - ४१६ ००२
कार्यालयीन दूरध्वनी क्र. (०२३१) २५४३८९४, २५४२७१८, २५४२०६०
ईमेल :- dydekop@gmail.com वेबसाईट :- www.dydekop.org


जा.क्र.शिउसं/कोवि/उमा-२/अंकामा/२०१९-२०/२०२०/ 6921-28 दि.- 9 APR 2020

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

विषय- शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मधील प्रति घडयाळी तासिका तत्वावरील शिक्षकांच्या वेतनाबाबत

संदर्भ- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१९/(प्र.क्र.१५४/१६)/ टीएनटी-२ दिनांक १८ सप्टेंबर २०१९

उपरोक्त विषयासंदर्भाधीन पत्राचे अनुषंगाने कोल्हापूर विभागातील सर्व अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयांना कळविण्यात येते की, संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० या वर्षाच्या संच मान्यता न करण्याचे शासन आदेश होते. त्यामुळे सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाच्या कोल्हापूर विभागातील वा अन्य कोणत्याही विभागातील संच मान्यता झालेल्या नाहीत. त्यामुळे घडयाळी तासिका तत्वावरील शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सन २०१९-२० मध्ये निर्माण झालेला आहे.

सन २०१९-२० मध्ये आपल्या कनिष्ठ महाविदयालयात विदयार्थी संख्येनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ प्रमाणे प्रति घडयाळी तासिका तत्वावरील पदांना कार्यभार शिल्लक असल्यास, सन २०१८-१९ मधील शिक्षक कार्यरत असतील व त्यांना या कार्यालयाने मान्यता दिलेल्या असलेस अशा शिक्षकांचे बाबतीत मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी हमीपत्र शिक्षणाधिकारी (माध्यमिक), वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांना सादर करावे आणि संबंधित शिक्षकांचे वेतन तात्काळ अदा करणेबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

(स.ध.सोनवणे)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- माहितीसाठी सविनय सादर

१. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-०१
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे-०१

प्रत- माहिती व कार्यवाहीसाठी रवाना

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

२/- शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये संच मान्यता होणार नसल्यामुळे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयाच्या प्राचार्याकडून प्रति घडयाळी तासिका तत्वावरील पदांचा कार्यभार उपलब्ध असल्याबाबतचे हमीपत्र घेऊन संबंधितांना वेतन अदा करण्याची तात्काळ कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा.